# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२०/०६/२०१६.

**१) घरातुन सोन्याचे दागिणे लंपास. :—**

दिनांक १८/०६/२०१६ रोजी २१.०० वा. ते दि. १९/०६/०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी निमराव चंदुजी झिंगरे वय ४५ वर्ष, रा. सिव्हील वार्ड साकोली हे स्व:ताच्या घराच्या समोरील दाराला कुलुप लावुन सास—याच्या घरी झोपण्यास गेले होते. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन फिर्यादीच्या घराच्या समोरील दाराचा ताल तोडुन आत प्रवेश केला व गोदरेज आलमारीचे पल्ले उघडुन पर्स मधुन २ सोन्याचे मंगळसुत्र ३ तोडयाचे, सोन्याची अंगठी १२ ग्रॅम ,सोन्याचे कर्णफुल २ नग वजन १ तोडा व नगदी २०,०००/—रु. असा एकुण कि. १,६५,०००/—रु. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. कारंडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची धडक, दोन जखमी. :—**

दिनांक १९/०६/०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान मोटार सायकल क्र. एमएच ४० ११८६ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व लापरवाहीने चालवुन नत्थुजी गाते यांच्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ९८९६ ला पवनी जवाहरगेट समोर धडक देवुन त्यांना गंभिर जखमी करून स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाला. आरोपी चालक हा दारूच्या नशेत (अमलाखाली)असल्याबाबत डॉ. अहवाल प्राप्त झाल्याने व फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) जनावरांना कोंबुन अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १९/०६/०१६ रोजी ०६.१५ वा. दरम्यान ट्रक क्र. एमएच ३१ सीबी ७२३३ चा आरोपी चालक व मालक यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रकमध्ये अवैधरित्या बिना परवाना लहान मोठे ३० जनावरे कि. १,६२,०००/—रु. चे कोंबुन अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोना. कुकडे पो.स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ११(ड)(ई) प्रा.नि.वा.का. सहकलम ९ प्रा.सं.का. सहकलम ८३ एमएमव्ही आर/१९२ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टरची धडक. :—**

दिनांक १९/०६/०१६ रोजी १२.०० वा. दरम्यान फिर्यादी राकेश अखिलेश तिवारी वय ३४ वर्ष, रा. कोराडी नागपुर यांची गाडी क्र. एमएच ३१ ईके ३६८४ ही गोसे खुर्द सावरबंध पॉवर प्लॅन्ट मध्ये बाजुला ऊभी ठेवली होती. ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल २५९५ च्या आरोपी चालकाने त्याच्या

ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने व लापरवाहीने चालवुन रिव्हर्स घेतांना फिर्यादिच्या गाडीच्या मागील बाजुस धडक दिली त्यामुळे गाडीचा मागील काच पडुन मागच्या खिडकीचा गेट डॅमेज करून कि. ६०००/—रु. चे नुकसान केले व फिर्यादीला ''जे बनते ते करून घे.'' अशी धमकी दिली. असे फिर्यादिचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.